*सदैव स्मरणात, भविष्यवेधी विचारात... राजीवजी गांधी!*
*कृतीशिल उपक्रमातून परिवर्तन, कौशल्य कलेतून जिवन उत्सव.*

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभाग (STS-MPCC) महाराष्ट्र राज्य, मुंबई

## प्रस्तावना

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्याधारित उपक्रम राबविणाऱ्यांना योग्य ते प्रोत्साहन देणे व त्यांचा आत्मीक सन्मान करणे, जेणेकरून त्यांच्याकडे असणाऱ्या कौशल्याचा नाविन्यपूर्ण प्रयोगशिलेतेचा सर्व समाजासाठी सकारात्मक ऊर्जारुपी उपयोग व्हावा. आज आपल्याकडे अनेकजण आहेत, ज्यांच्याकडे विशेष कौशल्य आहे. अनुभवातून नविनतेच्या प्रयोगातून त्यांनी त्याला अधिक उन्नत केले आहे. परंतु अनेकदा ते त्यांच्यापुरतेच मर्यादित राहते.

असे अनेक तरुण असतील ज्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान प्रयोगात स्वतःस वाहून घेतलंय. परंतु त्यांना पुरक पाठबळ किंवा प्रोत्साहन भेटत नसल्यानं ते क्षमता असूनही योग्य ते साध्य करू शकत नाहीत. अश्यांना सर्वार्थानं प्रोत्साहित करून त्याचा समाजासाठी आणि देशासाठी उपयोग करता येईल.

आजच्या विचित्र राजकीय ध्रुवी करण्याच्या धुक्यात बेरोजगार तरुण विशिष्ट सामाजिक, धार्मिक, राजकीय संधी साधुंच्या सहज गळाला लागल्याचं दिसतंय. त्याला काम नाही किंवा काय काम करावं हे सुचत नाहीत. मग सोशलमिडिया आणि विशिष्ट लोकांनी पाठलेला भ्रामक मिडिया त्याला हवं तसं गळी लावतोय.

वेगवेगळे कौशल्य प्राप्त केलेल्या तरुणांच्या कौशल्याचा प्रसार करून त्यांचा इतरांना फायदा व्हावा या प्रामाणिक उद्देशातून कार्य करणे, यासाठी छोट्या छोट्या प्रचार प्रसार पुस्तिका प्रकाशित करून सर्वदूर प्रसारित करणे, आपल्यातच आपल्यासारख्यांचे सततचे नाविन्यपूर्ण प्रयत्न इतरांनाही प्रोत्साहित करतात.

स्वकौशल्य विकसित करणारे विज्ञानप्रयोगाची इच्छा असणारे तंत्रज्ञान विकसित करू पाहणारे प्रयोगशिल शेतकरी खरं तर समाजाचे तरुणंच विचलित झालेले आहेत. इकडं वळवणे काळाची गरज आहे आणि देशाचाही काँग्रेस पक्ष हा कुठल्याही धर्म किंवा जातीसमुहापेक्षा नेहमीच देशाचा विचार करत आलाय आणि राहील. याच विचारांचं प्रामाणिक लोकशाहीवादी विचार घेऊन खऱ्या अर्थाने काँग्रेस विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य विभाग आत्मीक प्रयत्न करेल आणि काळानुरुप ते लोकांना आवडेलही. कारण काम कधीही बोलतं हेच ते सत्य आहे आणि खरं काम कुणालाही बोलू देत नाही हे पूर्ण सत्य.

***सदैव स्मरणात, भविष्यवेधी विचारात... राजीवजी गांधी!***
***कृतीशिल उपक्रमातून परिवर्तन, कौशल्य कलेतून जिवन उत्सव.***

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून तंत्रज्ञ, तांत्रिक कारागीर, कौशल्यपूर्ण काम करणारे कारागीर, नाविन्यपूर्ण काम करणारे प्रयोगशील युवक, प्रशिक्षक तंत्रस्नेही शिक्षक, स्वतःच्या कौशल्यावर निर्मिती करणारे, माहिती तंत्रज्ञान हाताळणारे युवक, प्रयोगशील शेतकरी अशा लोकांनी संघटनात्मक बांधणी करून पक्षामध्ये सहभागी करून घेऊन समाजहित जोपासना करणे व काँग्रेस पक्षाच्या विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभागात कार्य करणारे कार्यकर्ते हे काँग्रेस पक्षाची विशेष टिम म्हणूण कार्य करतील.

**सेलचा उद्देश :-**

★ काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहचविणे, नविन कार्यकर्त्यांना पक्षाचे व्यासपीठ मिळवून देणे, कार्यकर्त्यांना स्वतःचे विचार मांडण्यासाठी संधी निर्माण करणे, सामाजिक प्रश्नावर कार्यकर्त्यांना एकत्र आणणे, चर्चासत्र आयोजन करणे, विविध घटकांकडून विधायक संकल्पना आलेली माहिती पक्षाच्या माध्यमातून सामाजिक अंमलबजावणी करणे, स्व.पंडीत जवाहरलाल नेहरू, स्व.राजीवजी गांधी यांच्या विचार संकल्पनेतील विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य कार्याबाबतचे लोकहिताय निर्णय कार्याचा प्रचार-प्रसार करणे.

★ काँग्रेस पक्ष व सर्व सेलच्या कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार करणे.

★ इतर पक्षापेक्षा आपला काँग्रेस पक्ष कसा अग्रेसर आहे त्या अनुषंगाने कार्यकर्ता ऊर्जा शिबिर कार्यक्रम राबविणे.

★ या विभागामुळे वंचित दुर्लक्षीत व्यक्तीला काँग्रेस पक्षाच्या टिममध्ये कार्याची संधी देणे.

★ विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्यावर काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आपल्यातील कला गुणांसाठी संधीचे व्यासपीठ निर्माण करून देणे.

★ या सेल मध्ये काम करणारे कार्यकर्ते काँग्रेस पक्षाचे ध्येय धोरण, सामाजिक विचार, विधायक उपक्रम कार्यक्रम राबवतील.

★ सेल च्या माध्यमातून प्रदेश कार्यकारिणी, विभागीय कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणी, शहर कार्यकारिणी तसेच प्रत्येक गाव कार्यकारिणी असेल.

★ प्रत्येक पदाधिकारी गाठीभेटी, कार्यक्रम, उपक्रम, कार्यअहवाल प्रत्येक ३ महिन्यांनी सेलच्या प्रदेशाध्यक्षाकडे जमा करून एकत्रीत सर्व अहवाल प्रदेश काँग्रेस कमिटीकडे सादर केला जाईल.

- ★ काँग्रेस प्रदेश कमिटीच्या निर्देश सुचनांचे पालन करून कार्यक्रमाची अंमलबजावणी सेलच्या माध्यमातून केली जाईल.

**पदाधिकारी कर्तव्य, जबाबदारी :-**

- ★ प्रत्येक पदाधिकारी प्रदेश ते गावापर्यंत यांनी पक्षवाढीसाठी काम करावयाचे आहे.
- ★ काँग्रेस पक्ष विचाराधारा प्रोटोकॉल सांभाळावयाचा आहे.
- ★ सोशल मिडियामधआये प्रत्येक व्यक्तीचा सहभाग बंधनकारक असणार असून समाजाप्रती सामाजिक कार्य सहभाग असला पाहिजे.
- ★ कामकाजात एकसुत्रता ठेवून आपल्याकडे आलेले काम किंवा सुचना विनाविलंब पार पाडली जावी.
- ★ दर दिवस किमान १ तास पक्षकार्यासाठी प्रचार, प्रसार, संवाद-संकलन व प्रसारण कामात वेळ दिला पाहिजे.
- ★ आपण वास्तव्यास असणाऱ्या क्षेत्रातील विशेष घडामोडीकडे लक्ष असले पाहिजे. एखादी विशेष बाब असल्यास आपल्या वरिष्ठांना कळविली गेली पाहिजे.
- ★ पक्ष कार्यक्रम, उपक्रम राबविताना संबंधितांना एकत्र मिटींगच्या माध्यमातून सांगोपांग चर्चा करून नियोजन करणे.
- ★ निवड झालेला पदाधिकारी पक्ष कार्यात सहभागी दिसून येत नसेल त्याची ॲक्टीव्हिटी दिसून येत नसेल, मिटींगला वेळ देत नसेल तर पूर्वसुचना न देता पदभार काढून घेतला जाईल.
- ★ पदाधिकारी आपल्या कार्याचा अहवाल वेळोवेळी प्रदेश कार्यालयाकडे सादर करतील.
- ★ पदाधिकारी कार्यकर्ते एकमेकांचा आदर, मान-सन्मान सांभाळतील.

**सेल पक्ष प्रचार प्रसार कार्यक्रम उपक्रमा बाबत. :**

- ★ विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य विभागाच्या माध्यमातून 'राजीव गांधी रेडीओ' (आर.जी.रेडीओ) ॲप ची निर्मिती करून २४ तास या रेडीओचे प्रसारण सुरु असेल.

- ★ सोशल मिडीयाच्या माध्यमातून 'दिन विशेष महत्व' पोस्ट प्रसारीत केली जाईल.
- ★ काँग्रेस पक्ष व सर्व विभागाच्या कार्यक्रमाचा प्रचार प्रसार निमंत्रण महत्व सोशल मिडीया व रेडीओच्या माध्यमातून प्रसारीत केले जाईल.
- ★ काँग्रेस पक्षाच्या शिदोरी अंकाचे वाचन रेडीओ माध्यमातून केले जाईल.
- ★ विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल कार्यकर्ते स्वतःच्या नावापुढे STS.INC नावाने सोशल मिडियामध्ये अकाऊंट चालवतील, जेणेकरून पक्षाचा कार्यकर्ता स्पष्ट होऊन समाजमाध्यमामध्ये पक्ष मिडीया बळकट दिसेल.
- ★ काँग्रेस पक्षातील सर्वांसाठी जनतेच्या मनातील विचार मांडण्यासाठी 'जन की बात' कार्यक्रम प्रसारीत केला जाईल.
- ★ विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य विभागाचे युट्युब चॅनेलच्या माध्यमातून लोकोपयोगी कार्यक्रमाचे प्रसारण करून, जास्तीत जास्त लोक जोडण्याचे काम केले जाईल.
- ★ प्रचार माध्यमाचा वापर उदा. पॉम्पलेट, भिंतीवर पेन्टींगचा वापर इत्यादी.
- ★ विज्ञान तंत्रज्ञानावर, कौशल्यावर आधारीत उपक्रम राबविणाऱ्या तसेच लोकोपयोगी प्रयोग उभारणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन दिले जाईल.
- ★ स्व.राजीवजी गांधी उत्सव कौशल्याचा सन्मान सोहळा आयोजित केला जाईल.
- ★ छोट्या पुस्तिका, दिनदर्शिका माहिती तंत्रज्ञानावर प्रकाशित केल्या जातील.
- ★ प्रयोगशील शेतकरी, प्रयोगशील कारागीर, प्रयोगशील सॉफ्टवेअर (डेव्हलपर्स), प्रयोगशील इंजिनिअर, टाकाऊ पासून टिकाऊ बनविणाऱ्या व्यक्ती-संस्था, लोकोपयोगी सेवा व वस्तू निर्माते यांच्या मुलाखती प्रसारीत केल्या जातील.
- ★ कौशल्य व उद्योजकता कार्यशाळा, मेळावे घेतले जातील.
- ★ गाव पातळीवर सजावट स्पर्धेचे आयोजन करणे, उदा. गौरी लक्ष्मी, गणपती उत्सव, बैलपोळा सण, नवरात्र उत्सव इ.
- ★ विविध शासकीय योजनांची जाणीव जागृती केली जाईल.
- ★ काँग्रेस पक्षाच्या सरकारच्या माध्यमातून विधायक उभारलेल्या कामाचा चित्ररुपी रथाचे प्रदर्शन महाराष्ट्र राज्यामध्ये फिरविले जाईल.

- ★ विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य आधारीत कार्य करणाऱ्या व्यक्तीमत्व, संस्थांचा प्रतिवर्षी गुणगौरव सोहळा जिल्हास्तरीय/राज्यस्तरीय आयोजित केला जाईल.
- ★ संत, महापुरुष, समाजसुधारक, वैज्ञानिक, जवान, किसान, श्रमिक यांच्या विचार कार्याचे सामाजिक उपक्रमाने कार्यक्रम आयोजित केले जातील.
- ★ विज्ञान प्रदर्शन, चित्रकला, हस्तकला स्पर्धा तसेच बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार यांच्या कौशल्याचे कार्यक्रमाद्वारे आयोजन केले जाईल.
- ★ राज्यातील कच्चा माल निर्मिती करणाऱ्या उद्योजकांना एका व्यासपीठावर व्यवसाय वाढीसाठी योजना उपलब्ध केल्या जातील.
- ★ राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत गाव, तालुका, जिल्हा प्रशिक्षण केंद्र उभारणेसाठी कुशल प्रशिक्षकांना व केंद्रचालकांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊन योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल.
- ★ विविध व्यक्तीस, सामुहिक, महिला बचतगट, शेतकरी बचतगट, तसेच बेरोजगार तरुण तरुणींना विविध यशस्वी कंपन्यांच्या माध्यमातून नवीन उद्योग उभारणीस सहकार्य केले जाईल व उद्योग उभारणीस भांडवल शासन योजनेतून उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल.
- ★ आयकर, वस्तू व सेवा कर, खरेदी विक्री सेवा यास तंत्रज्ञानाची जोड देण्याबाबत तज्ञ व्यक्तीमार्फत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.
- ★ विविध क्षेत्रातील अद्यावत तंत्रज्ञानाबाबत तज्ञ व्यक्तीमार्फत कार्यशाळा आयोजित केल्या जातील.
- ★ नववैज्ञानिक प्रयोग करीत असलेल्या नव उद्योजकांच्या प्रयोगाला साजेसे व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

***पदांची संख्यानिहाय विभागणी :***

१) **प्रदेश विभाग कार्यकारिणी**

प्रदेश अध्यक्ष - १
उपाध्यक्ष - ५
सेक्रेटरी - २
संघटक - १०
सोशल मिडियाप्रमुख - ५
प्रसिद्धीप्रमुख - २
समन्वयक - २
सरचिटणीस - ५
चिटणीस - ५

२) **प्रादेशिक विभागीय कार्यकारिणी**

**कोकण, औरंगाबाद (मराठवाडा), पुणे (प.महाराष्ट्र), नाशिक, नागपूर, अमरावती (विदर्भ)**

विभागीय अध्यक्ष- १
उपाध्यक्ष - ५
सेक्रेटरी - १
संघटक - ५
सोशल मिडियाप्रमुख - २
प्रसिद्धीप्रमुख - १
समन्वयक - १
सरचिटणीस - ५
चिटणीस - ५

३) **जिल्हा कार्यकारिणी**

जिल्हाध्यक्ष - १
उपाध्यक्ष - २
सेक्रेटरी - १
संघटक - ५
सोशल मिडियाप्रमुख - २
प्रसिद्धीप्रमुख - १
समन्वयक - १
सरचिटणीस - ५
चिटणीस -५

४) **तालुका कार्यकारिणी**

तालुकाध्यक्ष - १
उपाध्यक्ष - २
सेक्रेटरी - १
संघटक - २
सोशल मिडियाप्रमुख - २
प्रसिद्धीप्रमुख - १
समन्वयक - १
सरचिटणीस - २
चिटणीस - २

५) **शहर कार्यकारिणी**

शहर अध्यक्ष - १
उपाध्यक्ष - १
सेक्रेटरी - १
संघटक - १
सोशल मिडियाप्रमुख - १
प्रसिद्धीप्रमुख - १
समन्वयक - १
सरचिटणीस - १
चिटणीस - १

६) **शहर जिल्हा कार्यकारिणी**

शहर जिल्हा अध्यक्ष - १
उपाध्यक्ष - २
सेक्रेटरी - १
संघटक - २
सोशल मिडियाप्रमुख - १
प्रसिद्धीप्रमुख - २
समन्वयक - १
सरचिटणीस - २
चिटणीस - १
वार्ड अध्यक्ष - १ (प्रत्येक वार्डास १ याप्रमाणे)

७) **गावपातळीवरील कार्यकारिणी**

शाखा अध्यक्ष - १
उपाध्यक्ष - १
सेक्रेटरी - १
संघटक - १
सोशल मिडियाप्रमुख - १
प्रसिद्धीप्रमुख - १
समन्वयक - १
सरचिटणीस - १
चिटणीस - १

***(सुरेश यादव)***
***अध्यक्ष***
***विज्ञान-तंत्रज्ञान-कौशल्य विकास विभाग***
***महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, महाराष्ट्र राज्य, मुंबई***
***मोबा. ९१३०००५१७७***